MHSN020019582024

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१७१/२०२४ मधील
## नि. २९ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–६ नियम–१७ प्रमाणे प्रकरण दुरुस्तीसाठी दाखल करणेत आलेला आहे.

२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण अनावधानाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ (२अ) १८२७ अन्वये दाखल केले आहे. परंतु सदर प्रकरण हे भारतीय वारसा कायदा व दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे दाखल करणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित दुरुस्तीस परवानगी मिळणे गरजेचे आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रकरणाचे स्वरूप बदलत नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे गैरअर्जदारांचे नुकसान होणार नाही. म्हणून तिने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. गैरअर्जदार क्र.३ व ६ यांनी निशाणी क्र.३० वर म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केला आहे. गैरअर्जदारांनी अर्ज कथन केले आहे की, अर्जासोबत अर्जदाराने शपथपत्र दाखल केलेले नाही. प्रकरण चौकशीसाठी प्रलंबित आहे. अर्जदाराने नियोजित दुरुस्ती करणेसाठी कोणतेही कारण नमूद केलेले नाही. नियोजित दुरुस्ती योग्य नाही. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही प्रस्तावित दुरुस्तीस परवानगी मिळणेस पात्र आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय? | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ करिताः**

५. अर्जदारातर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तावित दुरुस्ती ही किरकोळ स्वरूपाची असलयामुळे प्रकरणाचे स्वरूप बदलत नाही. म्हणून त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६. गैरअर्जदार क्र. ३ व ६ तर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तावित दुरुस्ती ही संयुक्तिक नसल्यामुळे प्रकरणाचे स्वरूप बदलते. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

७. अर्जदाराने असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण अनावधानाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ (२अ) १८२७ अन्वये दाखल केले आहे. परंतु सदर प्रकरण हे भारतीय वारसा कायदा व दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे दाखल करणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित दुरुस्तीस परवानगी मिळणे गरजेचे आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रकरणाचे स्वरूप बदलत नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे गैरअर्जदारांचे नुकसान होणार नाही. अर्जदाराने अर्जाद्वारे तिची बाजू स्पष्टपणे मांडलेली आहे. दुरुस्तीचा अर्ज निकाली काढताना न्यायालयाचे मत उदार असले पाहिजे. दुरूस्तीचा अर्ज निकाली करताना दुरूस्तीची गुणवत्ता पाहणेची आवश्यकता नाही. अर्जातील नमूद दुरुस्ती ही संयुक्तीक असलयामुळे प्रकरणाचे स्वरुप बदलत नाही. वरील बाबी विचारात घेता नियोजीत

दुरूस्तीस परवानगी देणे उचित होईल. परिणामी मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करिताः**

८. वरील विवेचन व मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र.२ चे उत्तराकरिता खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२) अर्जदाराने आजरोजी दुरुस्ती करुन दुरूस्त प्रत दाखल करावी.

३) अर्जाचा खर्च प्रकरणात समाविष्ट करण्यात येतो.

SHAKTI UTTAMRAO DESHMUKH

Digitally signed by SHAKTI UTTAMRAO DESHMUKH
Date: 2026.08.12 16:38:28 +0530

सांगली. (श. उ. देशमुख)

दि.१२/०८/२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सांगली

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***V. S. Raut*** |
| Court | : | Civil Judge Sr.Dn., Sangli. |
| Date of order/judgment | : | 12/08/2026 |
| Signed by the Presiding Officer on | : | 12/08/2026 |
| Uploaded on | : | 12/08/2026 |